# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३३/२०२२**

**विद्यापीठ विभाग व संलग्नित महाविद्यालय संशोधन केंद्रातील पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुलाखत प्रक्रिया २०२१—२२.**

**संदर्भ** : १. विद्यापीठ परिपत्रक क्र. १० संदर्भ क्र. शै.प्रवेश/१७७ दि. १२/०१/२०२२.

कृपया वरील संदर्भीय परिपत्रकांचे अवलोकन करावे, ज्या अन्वये सन २०२१ साठी पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

विद्यापीठ विभाग व संलग्नित महाविद्यालयातील संशोधन केंद्रांनी व मान्यताप्राप्त संशोधन संस्थांनी पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीचा अहवाल दि. ०८/०२/२०२२ पर्यंत विद्यापीठास सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. पीएच.डी. प्रवेश मुलाखत अहवाल विद्यापीठास सादर केल्यानंतर विद्यापीठाकडून विद्यार्थी निवड यादीस मान्यता मिळणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. संशोधन केद्रांना बीओडी लॉगीनमध्ये विद्यार्थी यादी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. पीएच.डी. प्रवेश मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे महाविद्यालयाने बीओडी लॉगीनमधून सादर करावे.

२. निवड झालेल्या विद्यार्थ्याच्या नावापुढे त्याच्या मार्गदर्शकाचे नाव बीओडी लॉगीनमधूनच नमूद करावे.

३. पीएच.डी. प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवड यादी अचूकरित्या बीओडी लॉगीनमधून तयार करावी व बीओडी लॉगीनमधूनच ऑनलाईन पद्धतीने दि. १८/०२/२०२२ पर्यंत जमा करावी.

४. मुलाखत प्रक्रियेनंतर पीएच.डी. मुलाखत अहवाल विहीत वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे. सोबत जोडलेल्या चेकलिस्टप्रमाणे अहवाल सादर केले नसल्यास त्यानुसार संबंधित संशोधन केंद्राने तात्काळ त्याची पूर्तता करावी.

५. विद्यार्थी निवड यादी सादर करताना आरक्षणामध्ये कुठल्याही प्रकारची अदलाबदली करु नये.

६. संशोधक मार्गदर्शकाकडे विद्यार्थी वर्ग करत असताना विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या संशोधक मार्गदर्शक मान्यतापत्रानुसार संशोधक मार्गदर्शकाची मुदत विचारात घेणे आवश्यक आहे.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/६४१ )
दिनांक : ११/०२/२०२२ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. मा. संचालक, विद्यापीठ सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Documents to be submitted to University by research centers after personal interview to Ph.D. course.**

1. College Covering Letter.
2. Students attendance sheet with sign of students and committee members.
3. Subject wise Students mark list with sign of committee members.
4. New guide or extension of guideship letter. (If applicable)
5. Guide wise / subject wise / category wise seat distribution chart.
6. List of Guides with guideship letter.
7. List of selected students with sign of committee members.
8. Research center latest recognition letter.
9. Consolidated assessment sheet as per points mentioned in circular no. 383/2021 dated 29/12/2021 of personal interview.

• • •